**रेफरन्स (आय टी) नं ८/२००९**
सरतपास नि. यू — ३२९

साक्षीदाराचे नाव : श्री अहमद बख्तीयार खान शपथेवर पुढील उलटतपास
श्री जे बी शालीग्राम वकिल प्रथम पक्षकार तर्फे पुढील उलटतपास

१२. हे खरे की न्यायालयामध्ये जे रेजिस्टर दाखल केले आहे परंतु कोणत्याही रेजिस्टरवर माझी सही नाही. हे खरे की निशाणी यु—३४९ वर माझ्या सहया नाही.

१३. मी श्री जावेद इब्राहिम पठान यांना ओळखतो. ते कामगार व आमच्या युनियनचे उपाध्यक्ष होते. त्यांचे या केस मध्ये साक्ष झाली किंवा कसे हे मला माहित नाही. मी माझे आता आधार कार्ड किंवा ड्रायविंग लाइसेन्स आणलेले नाही. मी माझे निवडणूक आयोगाने दिलेले आय.डी आणले आहे. मला माझे आधार कार्ड किंवा ड्रायविंग लाइसेन्स पुढील तारखेस पुन्हा आणण्याची ग्वाही देतो.

१४. निशाणी क्रमांक यु ३५० मधील पान क्रमांक ५१० वर जेनरल सेक्रेटरी यांची सही नाही. हे खरे की निशाणी यु ३५० मधील कोणत्याही पावतीवर जेनरल सेक्रेटरी म्हणून माझी सही नाही. हे खरे की मी दाखल केलेल्या निशाणी क्रमांक यु ३५० च्या पावत्या या स्थळप्रती आहे.

१५. महानगरपालीकेमध्ये जे कंत्राटी पध्दत होती ती बंद करण्यासाठी या युनियनने सन २००५ —२००६ साली योग्य त्या authority कडे दावे दाखल केले होते किंवा कसे हे मला पहावे लागेल. निशाणी क्रमांक यु—३४८ मधील कोणतीही annual return वरती माझ्या सहया नाहीत हे खरे आहे परंतु त्यातील माझ्या सहीचा कागद त्यात दाखल नाही. हे खरे की निशाणी क्रमांक यु—३५१ मधील पान क्रमांक ७७२ व ७७३ वर माझी सही नाही. मी दिनांक ४.६.२००९ रोजी या युनियनचा पदाधिकारी

नव्हतो. हे खरे की मी पदाधिकारी नसल्याने दिनांक ४.६.२००९ च्या मिटींग मध्ये काय झाले याची मला माहिती नाही. मी सन २००९ पासून आज पर्यंत या युनियनचा पदाधिकारी नाही. हे खरे नाही की मी पदाधिकारी नसल्याने सन २००९ पासून या केसच्या संदर्भात काय झाले याची मला माहिती नाही. या केस संदर्भात माननीय मुंबई उच्च न्यायालय व माननीय सर्वोच्च न्यायालय येथे कोण–कोणती प्रकरणे चालू होती याची मला माहिती आहे. अवमान याचिका क्रमांक ५८/२०१७ या याचिके बद्यल मला माहिती आहे. ही याचिका द्वितीय पक्षकार युनियनने दाखल केली होती. हे खरे की या प्रकरणामध्ये महानगरपालीके व्यतिरिक्त इतर तीन पक्षकार होत्या. त्या तीन पक्षकार संस्थेची नावे सुलभ इंटरनॅशनल, एम पी एन्टरप्राईजेस, विशाल एन्टरप्राईजेस, अशी आहे. हे खरे नाही की केस मधील कामगार हे या तिनही संस्थेचे कामगार असल्यामुळे त्यांना पक्षकार केले होते. सन २००४ ते २००५ च्या दरम्यान आमच्या संघटनेने महाराष्ट्र शासनाकडे कंत्राटी कामगार पध्दत बंद करण्याबद्यल अर्ज केला होता व तो अर्ज महाराष्ट्र शासनाने नामंजुर केला हे मला माहित नाही. हे खरे नाही की या केसच्या संदर्भात मला कोणतीही माहिती नाही व कोणतीही कागदपत्रे न पाहता मी साक्षी देत आहे.

उलटतपास संपला

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

पुणे
दिनांक : ११/२/२०१९

( पि. रा. भावके–पाटील )
सदस्य,औद्योगिक न्यायालय, पुणे